# प्रकरण पहिले

# १९८० नंतरची मराठी कविता: स्वरूप व प्रेरणा

## प्रकरण पहिले

# १९८० नंतरची मराठी कविता : स्वरूप व प्रेरणा

१) प्रास्ताविक

२) आधुनिक मराठी कविता : स्वरूप व प्रेरणा

३) १९८० नंतरचे कवी व काव्यलेखन योगदान

४) १९८० नंतरच्या कवितेचे स्वरूप-विशेष

५) १९८० नंतरच्या काव्याचे वेगळेपण

६) १९८० नंतरच्या काव्याचे विशेष व मर्यादा

---

# प्रकरण पहिले

# १९८० नंतरची मराठी कविता : स्वरूप व प्रेरणा

## १) प्रस्तावना :

१९६० नंतरच्या साहित्यात अनेक प्रवाह निर्माण झाले. ग्रामीण, दलित, नागर, आदिवासी, स्त्रीवादी साहित्याने मराठी साहित्यक्षेत्रामध्ये स्वतंत्र स्थान निर्माण केले. १९८० नंतरचे साहित्य अधिकाधिक समाजनिष्ठ व वस्तुनिष्ठ बनू लागले. मराठी कवितेतून समाजातील वाढता भोगवाद, चंगळवाद, भ्रष्टाचार, नैतिक मूल्यांची घसरण, मानवाचे निर्जीव वस्तुसृष्टी व प्राणीसृष्टी यामुळे होत चाललेले अमानवीकरण, सर्वच क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्या या सर्व जीवन-जाणिवांचा शोध घेतला जाऊ लागला. स्वातंत्र्यानंतरच्या ४०-५० वर्षात मानवी जीवनात जी स्थित्यंतरे झाली त्याचा वेध आणि मानवी अस्तित्त्वाचा शोध, जगण्याच्या अस्मितेचा बोध इ. बाबींना कवेत घेणारी १९८० नंतरची कविता अधिक चिंतनशील बनताना दिसते.

ही नवकविता मानवी मनाचा तळ शोधणारी, समाजजीवनाचे चिंतन करणारी आणि मानववादाचा स्वीकार करणारी आहे. तसेच जगण्याचा आणि जगण्यातील सोसण्याचा दाह मांडणारी सतर्क, संवेदनशील कविता आहे. ज्ञानेश्वर कोळींची कविता या नवकवितेचे प्रतिनिधित्वच करते. समाजातील वैफल्यग्रस्ततेची विदारक जाणीव करून देणारी ही कविता विचार, चिंतन, अंतर्मनातील वृत्ती, सामाजिक जाणीव या बाबतीत कितपत सरस ठरते याचा अभ्यास पुढे केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात '१९८० नंतरच्या मराठी कवितेचे स्वरूप व प्रेरणा' यांचा विचार केलेला आहे. तसेच आधुनिक मराठी कवितेचे स्वरूप-प्रेरणा व नवकवितेतील महत्त्वपूर्ण वळणांचा धावता आढावा घेतलेला

आहे. त्याचबरोबर नवकाव्याचे वेगळेपण दाखवून विशेष व मर्यादा सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मराठी वाङ्मयात कवितेचे दालन समृद्ध असल्याने प्रस्तुत प्रकरणात सर्वच कवींच्या कवितेचा आढावा घेणे लघुप्रबंधाच्या मर्यादेमुळे शक्य होत नाही. काही प्रमुख कवींच्या कवितेचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

## २) आधुनिक मराठी कविता स्वरूप व प्रेरणा :

१८८५ ते १९२० हा मराठी कवितेचा क्रांतिकाल होय. याच कालावधीत मराठी काव्याचे बाह्यांग आणि अंतरंग या दोन्ही घटकांच्या स्वरूपात आमूलाग्र क्रांती घडून आली. या क्रांतीचे आद्यप्रवर्तक होते केशवसुत. केशवसुतांनी मराठी काव्यप्रवाहाला चिंतनपूर्वक नवी दिशा दिली. सामाजिक, राजकीय काव्य, निसर्गकाव्य, प्रेमकाव्य, गूढगुंजनात्मक काव्य व काव्यविषयक जाणिवांची कविता लिहिणाऱ्या केशवसुतांनी आपल्या काव्यलेखनामध्ये विविध अभिनव प्रयोग केले. केशवसुतांचे हे कार्य मराठी वाङ्मयातील महत्त्वाचे 'बंड' मानले जाते. केशवसुतांच्या काव्यलेखनाचे हे वेगळेपण विशद करताना नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, ''कवी केशवसुतांचा काळ तर संकेतांच्या बुजबुजाटांचा. या संकेतांच्या बुजबूजाटातून अनुभव व्यक्त करणे आणि तोही 'आत्मनिष्ठ' पद्धतीने व्यक्त करणे ही कठीण बाब. म्हणून केशवसुत अगदी पहिल्यांदाच ठणकावितात, 'कविता कशी असावी, नसावी हे सांगणारे तुम्ही कोण ?' क्रमाने त्यांची ही सातवीच कविता. म्हणजे त्यांना जे जाणवले ते फार लवकर जाणवले आणि महत्त्वाचेही. आतापर्यंत मराठी वाङ्मयात जी बंडे झाली त्यातले हे महत्त्वाचे बंड.''[१] केशवसुतांच्या काव्यासंदर्भात कोत्तापल्ले यांचे मत महत्त्वपूर्ण वाटते. कारण केशवसुतांची कविता आत्मनिष्ठ आहे.

केशवसुतांच्या पूर्वीचे काव्य हे पारंपरिक पद्धतीचे होते. वृत्तबद्धता हे या काव्याचे वैशिष्ट्य होते. काव्य कसे असावे या विषयीचे काही नियम पाळून कवी लिहित होते. या काव्याचे विषयही ठराविक असत. केशवसुतांनी हे बंधन झुगारले. त्यांनी आत्मनिष्ठतेवर, वस्तुनिष्ठेवर भर दिला व मानवी भावभावनेच्या चित्रणाला महत्त्व दिले. ओळींची, वृत्तांची, विषयांची बंधने झुगारली. काव्यविषयात विविधता आणली. 'सुनितरचना' हा काव्यप्रकार मराठीत आणला. सौंदर्यवादाचा पुरस्कार केला. भक्ती आणि धार्मिकते भोवती फिरणाऱ्या काव्याला वास्तवाकडे वळविले. केशवसुतांच्या या कार्याची दि.के. बेडेकरांनी केलेली मीमांसा महत्त्वपूर्ण वाटते.

''केशवसुतांच्या काव्यविश्वात मानवी मनाला केंद्रिय स्थान लाभले. ही क्रांती फार मुलभूत आहे. त्यामुळे पूर्वी पारलौकिक अशा तत्त्वाभोवती गुंफले गेलेले श्रेयचिंतन व कलात्मक सर्जन आता ऐहिकाशी, मानवी मनाशी निगडित झाले.''[२]

आधुनिक कवितेच्या वळणावरील पुढील काळातील महत्त्वपूर्ण कवी म्हणून बालकवी व गोविंदाग्रज यांचा उल्लेख करावा लागेल. बालकवींनी 'निसर्गकाव्याला' वेगळे परिमाण प्राप्त करून दिले. मात्रावृत्तांचा वापर काव्यात मोठ्या प्रमाणात केला. भावगीते, सुनीते, आत्मलेखनपर काव्ये, प्रेमकाव्ये, निसर्गकाव्ये, गूढगुंजनपर काव्य अशा विविध काव्यरचना केल्या. कल्पनासृष्टीची निर्मिती, स्वच्छंदीवृत्तीचे काव्य हे त्यांच्या कवितेचे विशेष ठरले. गोविंदाग्रजांच्या कवितेतील प्रणयभावना, प्रेमातील उत्कटता, उदात्तता, प्रेमभंगाच्या दु:खाचे वर्णन या घटकांनी कवीच्या वैयक्तिक सुखदु:खात्मक भावनांना काव्यात स्थान मिळू लागले. गोविंदाग्रज 'प्रेमाचे शाहीर' या नावाने महाराष्ट्राला परिचित झाले. प्रेमाची विविध रूपे त्यांनी आपल्या कवितेतून रंगविली. मराठी कवितेत बालकवी व गोविंदाग्रज यांचे स्थान वरच्या दर्जाचे आहे. भावनोत्कटता, भाषेचा

झगमगाट, गूढगुंजन, मनोहर वर्णनशैली या विविध विशेषांनी त्यांचे काव्य मराठी भाषेत अमर झाले आहे.

भारा तांबे यांनी कवितेतून जीवनविषयक व प्रेमविषयक अनेक जाणिवा प्रकट केल्या. त्यांनी नाट्यकाव्ये मोठ्या प्रमाणावर लिहिली. काव्यातून सौंदर्याविष्कार घडविला. त्यांच्या काव्याचे वेगळेपण विशद करताना स.रा. गाडगीळ लिहितात, ''तांबे हे केशवसुत, बालकवी, गडकरी, रे.टिळक, चंद्रशेखर यासारख्या अनेक कवींशी समकालीन असूनही त्यांच्या काव्याशी कोणाचीही तुलना करता येत नाही. केशवसुत सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक अशा सर्वच क्षेत्रात क्रांतिकारक परिवर्तनवादी असल्याने त्यांच्याशी कोणाही समकालीन कवीची तुलना करता येत नाही. कविवर्य तांबे यांचे काव्याचे उद्दिष्ट तर पूर्ण वेगळे आहे. सौंदर्यनिर्मिती आणि शुद्ध-निरपेक्ष आनंद हेच काव्याचे अंतिम उद्दिष्ट ही तांबे यांची भूमिका होती.''[३] गाडगीळांच्या या मतातून कविवर्य तांबे यांची काव्यविषयक भूमिका स्पष्ट होते.

माधव जूलियन, गिरिश, यशवंत, श्री.बा. रानडे, मनोरमा रानडे, द.ल. गोखले, दिवाकर या रविकिरण मंडळातील संस्थापक कवींनी कवितेला व्यासपीठावर आणण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. या कवींनी काव्यवाचनाच्या कार्यक्रमाला सुरूवात केल्यामुळे कवितेच्या लेखनाबरांबर त्याच्या सादरीकरणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. रविकिरण मंडळातील इतर कवींच्या कवितेपेक्षा माधव जूलियन यांची कविता आशय, अभिव्यक्ती, नवनवे प्रयोग या दृष्टीने जादा महत्त्वपूर्ण वाटते. महाविद्यालयात असताना मित्रांनी एका इंग्रजी कादंबरीतील नायकाचे नाव दोघामधील स्वभावसादृश्याने त्यांना दिले त्या पाश्चात्य 'जूलियन' नावाचा मराठी नावाबरोबर स्वीकार करूनच माधव त्र्यंबक पटवर्धनांनी काव्यक्षेत्रात पदार्पण केले. समाजाच्या दांभिक स्वरूपाचे दर्शन घडविण्यासाठी त्यांनी 'सुधारक' (१९२८) हे दीर्घकाव्य लिहिले. 'विरहतरंग' (१९२६) हे प्रेमकाव्य,

'गज्जलांजली' (१९३३) हा गझलसंग्रह, 'तुटलेले दुवे' (१९३८) हा सुनीतसंग्रह, 'नकुलालंकार' (१९३९) हा झब्बूशाहीवरील उपहासपर काव्य, 'रूबाया' अशी वैविध्यपूर्ण रचनांचीही निर्मिती केली.

रविकिरण मंडळातील आणखी एक महत्त्वपूर्ण कवी म्हणजे 'यशवंत'. स्फुट आणि दीर्घ अशी दोनही प्रकारची काव्यरचना त्यांनी केली. 'यशवंती', 'विणाझंकार', 'यशोधन' हे त्यांचे स्फुट कविता संग्रह. तर 'बंदिशाळा', 'जयमंगला', 'काव्यकिरीट' ही खंडकाव्ये प्रसिद्ध आहेत. रविकिरण मंडळातील इतर कवींनीही काव्यक्षेत्रात मोलाची भर घातली. त्याची नोंद घेत असताना रा.श्री. जोग यांचे मत महत्त्वाचे वाटते.

"आधुनिक मराठी काव्याच्या इतिहासात रविकिरण मंडळाची कामगिरी मोठी मोलाची झाली यात शंका नाही. यातील पटवर्धन, गिरिश, यशवंत या तिघांनी व्यक्तिशः आणि मंडळाने सामुदायिकपणे मराठी काव्यात संख्येने आणि गुणदृष्ट्या जेवढ्या मोलाची भर घातली, तेवढी दुसऱ्या कोणत्या मंडळाने नाहीच, पण व्यक्तीनेही घातली नाही."[४] रा.श्री. जोग यांचे मत योग्य वाटते.

रविकिरण मंडळानंतर येणाऱ्या कवीत अनिल, कुसुमाग्रज, बा.भ. बोरकर हे प्रमुख कवी होत. 'फुलवात' ते 'सांगाती' हा अनिलांच्या कवितेचा चाळीस वर्षांहून अधिक काळचा प्रवास आहे. अनिलांची कविता कोमल भावना व्यक्त करणारी, अंतरतृप्तीची गूढ संवेदना व्यक्त करणारी असली तरी तिला सामाजिकतेची दुसरी बाजूही आहे. 'भग्नमूर्ती' (१९४०), 'निर्वासित चिनी मुलास' (१९४३), 'पेर्ते व्हा' (१९४७) या संग्रहातून ही सामाजिक जाणीव व्यक्त होते. अनिलांच्या काव्याचे मोठेपण विशद करताना गो.म. कुलकर्णी लिहितात, "डोळ्यासमोरचा रस्ता बारा वाटांनी विखुरलेला असता आणि सहपथिकांच्या जथ्थ्यात गोंधळ माजलेला असता, स्वतःच्या अंतःप्रेरणेला

पटलेला मार्गच चोखळण्यास अंगी आत्मप्रत्ययाचे फार मोठे बळ असावे लागते. अनिलांच्या ठिकाणी ते असल्याची ग्वाही त्यांचे 'फुलवात' सकट सारेच संग्रह देतात.''[५]

कुसुमाग्रज - विष्णु वामन शिरवाडकर हे मराठी काव्य परंपरेतील एक महत्त्वपूर्ण कवी. 'जीवनलहरी' (१९३३), 'विशाखा' (१९४२), त्याचबरोबर 'हिमरेषा', 'वादळवेल', 'छंदोमयी', 'मुक्तायन' हे त्यांचे महत्त्वपूर्ण कवितासंग्रह. देशप्रेम, स्वातंत्र्य-समतेचा पुरस्कार ही कुसुमाग्रजांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. कुसुमाग्रजांच्या कवितेने सामाजिक जाणिवा मोठ्या प्रमाणात अभिव्यक्त केल्या. कुसुमाग्रजांच्या कवितेत व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणिवांविषयी नागनाथ कोत्तापल्ले लिहितात,

''अर्थात साम्यवादी दृष्टी असणे आणि आशावादी असणे हे वैशिष्ट्य असले तरी महत्त्वाची खऱ्या अर्थाने गोष्ट म्हणजे, केशवसुतानंतरच्या एका मोठ्या कालखंडानंतर मराठी कवितेत सामाजिक जाणिवा प्रथमच एवढ्या समर्थपणे व्यक्त होत होत्या.''[६]

या काळातील महत्त्वपूर्ण कवी बा.भ. बोरकर यांचा पहिला काव्यसंग्रह. 'प्रतिभा' १९३० साली प्रसिद्ध झाला. पण बोरकर खऱ्या अर्थाने प्रसिद्ध झाले ते 'जीवनसंगीता'ने (१९३७) पुढे 'दुधसागर' (१९४७), 'आनंदभैरवी' (१९५०), 'गितार' (१९६६), 'चैत्रपुनव' (१९७०) अशा विविध काव्यसंग्रहाच्या द्वारे अर्धशतकाहून अधिक वर्षे बोरकरांनी काव्यलेखन केले.

या काळात संजीवनी मराठे, पद्मा गोळे, शांता शेळके इ. कवयित्रींच्या कवितेनेही मराठी कवितेत महत्त्वपूर्ण भर घातली.

स्वातंत्र्योत्तर काळात कवितेच्या रचनेत व अभिव्यक्तीत विविधता आढळते. मराठी कविता अधिक चिंतनगर्भ व अंतर्मुख झाल्याचे दिसते. पारंपरिक विषयांना या काळातील कवितेने छेद दिला. या 'नवकाव्याचे' जनक म्हणून बाळ सीताराम मर्ढेकरांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागेल. 'शिशिरागम' (१९३८) या पहिल्या काव्यसंग्रहात

मात्र त्यांची कविता सौंदर्यवादाकडे झुकलेली आहे. आशय अभिव्यक्तीच्या दृष्टीनेही ती नवी वळणे मांडणारी वाटत नाही. मात्र 'काही कविता' (१९४७), 'आणखी काही कविता' (१९५१) या दोन संग्रहातील नवनव्या प्रयोगांनी, अनोखे अनुभवविश्व, यंत्रसंस्कृतीचा परिणाम, बदलती मानसिकता, महायुद्धाचे परिणाम, नव्या प्रतिमा व शब्दनिर्मिती इत्यादीमुळे मर्ढेकर नवकाव्याचे जनक ठरले.

मुक्तिबोधांनी 'नवी मळवाट' (१९४९) आणि 'यात्रिक' (१९५७) या काव्यसंग्रहातून रोमँटिक कवितेला धक्का दिला. सामाजिक जाणिवेची आशावादी कविता त्यांनी लिहिली. त्यांची कविता मुक्तछंदात्मक रचना घेऊन अवतरते. मुक्तछंदात्मक रचनेसंबंधी त्यांनी मांडलेले मत महत्त्वपूर्ण आहे.

''सामाजिक जीवनातील अनेक सत्यांचे आणि जाणिवांचे अंकन करावयास मुक्तछंद अगर त्या जातीचा छंदच उपयुक्त आहे. तो अनुभूमीच्या वेगाबरोबर निर्झरासारखा वेगात वाहतो किंवा अनुभूतींच्या गहन-संथ गतीबरोबर विस्तृत आणि मंद लयीत चालतो. भावनेच्या वळशाबरोबर तोही ताबडतोब वळसे घेऊन वाढू लागतो. भावनेच्या एकामागून एक प्रकट होणाऱ्या अनेक प्रकारच्या लयींबरोबर मुक्तछंदही द्रुतगतीचा मंदगतीचा होऊ शकतो.''[७]

कमीतकमी शब्दात अधिकाधिक आशयविश्व साकारणारे कवी म्हणजे पु.शि. रेगे. 'फुलोरा', 'हिमसेक' हे त्यांचे प्रसिद्ध काव्यसंग्रह. भाषासौंदर्याचा अविष्कार, लयबद्ध मांडणी, अल्पाक्षरत्व ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये होत. त्यांचा 'पुष्कळा' (१९५९) हा काव्यसंग्रह त्यादृष्टीने महत्त्वाचा आहे.

गोविंद विनायक करंदीकर हे नवकाव्यातील एक प्रयोगशील कवी. 'स्वेदगंगा', 'मृदगंध', 'जातक', 'धृपद' हे त्यांचे महत्त्वपूर्ण काव्यसंग्रह. मुक्तछंद, सुनीत, अभंग, गझल, सूक्त, तालचित्रे, विरूपिका, धृपद अशा विविध प्रकारामध्ये त्यांनी काव्यरचना

केली. विंदानी कविता अधिक आशयघन व सखोल बनविली. याच काळात मराठी काव्याला बहरविणारे आणखी महत्त्वाचे कवी म्हणजे 'मंगेश पाडगावकर' आणि 'वसंत बापट', विंदा-पाडगावकर-बापट या तिघांनी काव्यवाचनाचे कार्यक्रम करून मराठी कविता घरोघरी पोहचवली. 'धारानृत्य', 'सलाम', 'विदुषक', 'मीरा' हे पाडगावकरांचे गाजलेले कवितासंग्रह.

इंदिरा संतांची कविता याच काळात निर्माण झाली. 'शेला', 'मेंदी', 'मृगजळ', 'रंगबावरी', 'बाहुल्या' या काव्यसंग्रहांचा विचार केला असता इंदिरा संतांची कविता हळूवार भाववृत्तीचा प्रत्यय देणारी, जीवननिष्ठ व विशुद्धतेचा अनुभव देणारी कविता आहे.

आपल्या आगळ्या वेगळ्या प्रतिभासृष्टीने उठून दिसणारे मराठी काव्यप्रवाहातील आणखी एक महत्त्वपूर्ण कवी म्हणजे दिलीप चित्रे होय. १९६० ला 'कविता' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. 'बायका आणि इतर कविता' हा ही त्यांचा गाजलेला कवितासंग्रह. त्यांची कविता अंतर्मुख व आत्मभान व्यक्त करणारी आहे. त्यांच्या कवितेचे विशेष सांगताना रा.ग. जाधव लिहितात,

''चित्र्यांचे सर्जनशील आत्मभान मुलतः वैचारिक आहे. पण ते विलक्षण संवेदनात्मक व भावनात्मक कृतप्रत्ययातून (कन्व्हिक्शनमधून) खळखळणारे असते. त्यांची कविता म्हणूनच भावपूर्ण विधानांची कविता असते.''[८]

याच काळातील 'अरूण कोलटकर' हे एक महत्त्वपूर्ण कवी. अरूण कोलटकर चित्र्यांपेक्षा सहा वर्षांनी जेष्ठ असते तरी दोघांचेही काव्यलेखन १९५४-५५ च्या सुमारास सुरू झाले. 'अरूण कोलटकरांच्या कविता' (१९७७) हा त्यांचा कवितासंग्रह मात्र चित्र्यांच्या पुस्तकानंतर सतरा वर्षांनी प्रकाशित झाला. त्यांच्या कवितेतील दुर्बोधता, अपरिचित संदर्भ, वेगळी तंत्रे यामुळे त्यांची कविता अभ्यासकाकडून उपेक्षित राहीली.

कोलटकरांनी कवितेच्या परिचित काव्यचौकटी मोडून नव्या काव्यचौकटी तयार केल्या. त्यांच्या वेगळेपणाबद्दल केशव सद्रे लिहितात,

"कोलटकरांच्या कवितेचे प्रथमदर्शनीच लक्षात येणारे वैशिष्ट्य म्हणजे मर्ढेकर, रेगे आणि करंदीकर यांच्या कवितेपेक्षा ती अगदी भिन्न प्रकारची, नवी कविता आहे."[९]

१९५५ पासून कविता लेखन करणारे व वास्तवाची जाण असणारे कवी म्हणजे नारायण सुर्वे. समाजव्यवस्थेविरूद्ध बंडखोरी करणाऱ्या या कवीला आपले प्रश्न व परंपरेचे भानही आहे. नारायण सुर्वेंच्या कवितेने दलित कवितेला स्वत:चा मार्ग निर्माण करून दिला. सुर्वेच्या कार्याचे मोठेपण विशद करताना नागनाथ कोत्तापल्ले लिहितात,

"नारायण सुर्वे यांच्या बंडखोरीमुळे, विषमतेविरूद्धच्या विद्रोहामुळे नंतरच्या कालखंडात एक सशक्त अशी विद्रोही कविता निर्माण झाली. दलित कविता या नावाने ती ओळखली जाऊ लागली."[१०]

सुर्व्यांच्या कवितेतून संघर्षाची जाणीव प्रक्रट झाली. दलित कवितेचा घाट आणि भाषा घडविण्यात सुर्व्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. पुढे नामदेव ढसाळ, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर, वामन निंबाळकर असे वास्तव व विद्रोही कविता लिहिणारे कवी पुढे आले.

श्री. ना.धों. महानोर यांनी आपल्या कवितेतून 'रान' साकार केले. रानाची सुख-दु:खे, रूपे, रंग यांना त्यांनी आपल्या काव्याचा विषय बनविले. 'रानातल्या कविता' (१९६७) हा त्यांचा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आणि मराठी कवितेत त्यांनी स्वत:चे स्थान निर्माण केले. लोकगीतांचे सगळे सामर्थ्य महानोरांच्या कवितेत आढळते.

अशा अनेक कवींनी मराठी कवितेचा प्रवाह समृद्ध केलेला आहे. १९८० नंतर लिहिणाऱ्या कवींची कविता या काव्यप्रवाहात काय योगदान देते ? तिची आशयसूत्रे

काय आहेत ? स्वरूप कसे आहे याचा विचार काही प्रमुख कवींच्या कवयित्रींच्या कवितांच्या आधारे करू.

## ३) १९८० नंतरचे कवी व त्यांचे काव्यलेखनातील योगदान :

१९८० नंतर महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात मोठी स्थित्यंतरे घडली. समाजात हिंसाचार व दहशतवाद वाढीस लागला. हिंदू-मुस्लिम या दोन भिन्नधर्मीय समाजातील तेढ वाढू लागली. वाढता भ्रष्टाचार, चंगळवाद, धार्मिक दंगली यांना ऊत येऊ लागला. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांची हत्या, मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार, बहूजन समाजाचा सत्तेसाठी जोर, राजकीय क्षेत्रातील वाढता हिंसाचार या सर्व गोष्टींचा परिणाम वाङ्मयीन क्षेत्रावर होणे साहजिकच आहे.

१९८० नंतर साहित्याचे पीक उदंड वाढू लागले. शिक्षणाचा प्रसार आणि न्याय हक्काची जाणीव यामुळे अनेकांनी आपल्या लेखण्या सरसावल्या. कवितेच्या बाबतीत तर लिहिणाऱ्यांचे प्रमाण खूपच वाढले. १९८० पूर्वी लिखाणास सुरवात केलेल्या कवींची कविता ऐन बहरात येऊ लागली. त्यांचे अनेक सकस काव्यसंग्रह प्रसिद्ध होऊ लागले. काव्यसंग्रहावरची समीक्षाही लिहिली जाऊ लागली.

१९८० नंतरच्या कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे ही कविता संमिश्र प्रकारची आहे. अनेक कवी वेगवेगळ्या जाणिवा आपल्या कवितेतून प्रकट करू लागले. काव्याचे अनेक प्रवाह मराठी कवितेला समृद्ध करू लागले. ग्रामीण कविता, विद्रोही कविता स्त्रीवादी कविता, आदिवासी कविता या काव्यप्रवाहांनी अतिशय समर्थपणे व आशय अभिव्यक्तीच्या दृष्टीने अतिशय ताकदीने आपले स्थान मजबूत केले. काव्यामध्ये विषयाच्या दृष्टीने विविधता आली. महानगरीय जीवनातील संवेदना, विविध सामाजिक जाणिवा, ग्रामीण कवींच्या निसर्गकविता, दलित कवींचा विद्रोह, विविध स्त्रीसमस्यांची

उकल, उपेक्षित जीवनाची ओळख या सर्वांना मराठी कवितेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. कविता अधिक जिवंत बनू लागली, समाजाभिमुख होऊ लागली.

या काळात काव्यलेखन करणारे कवी विविध भागातील, विविध स्तरातील विविध समाजातील असल्याने आपल्या भाषेतून लिहिणाऱ्या कवींनी अत्यंत निष्ठेने आपला परिसर, आपल्या भावभावना रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्वच कवींच्या कविता कसदार आहेत असे मात्र म्हणता येणार नाही. एखादाच काव्यसंग्रह किंवा काही कविता लिहून मावळणारे कवीही पहावयास मिळतात. परंतु ज्या कवींनी १९८० नंतरच्या मराठी काव्यप्रवाहात महत्त्वाची भर घातली आहे अशा महत्त्वपूर्ण कवींचा विचार करू.

१९८० नंतर मराठी काव्यक्षेत्रामध्ये अनेक कवींनी आपली मुद्रा उमटवली. त्यामध्ये नारायण कुलकर्णी-कवठेकर, उत्तम कोळगावकर, अशोक बागटे, वसंत पाटणकर, गुरूनाथ सामंत, विवेक मोहन राजापुरे, अनिल द्रविड, अरूण शेवते, अरूण म्हात्रे, अनुराधा पाटील, रजनी परूळेकर अशी कितीतरी नावे सांगता येतील. याशिवाय ग्रामीण कविता, स्त्रीवादी कविता, विद्रोही कविता या प्रवाहांना सशक्त बनविणारे कितीतरी कवी १९८० नंतर पुढे आले. त्यापैकी काहींचे लेखन १९८० पूर्वी सुरू होते. मात्र कवितासंग्रह १९८० नंतर प्रकाशित झाले. या नव्या पिढीच्या कवितेने मराठी काव्यक्षेत्रात महत्त्वपूर्ण भर टाकली आहे.

विवेक मोहन राजापुरे यांचा 'सामोरा' हा कवितासंग्रह १९८५ मध्ये प्रकाशित झाला. ६३ कवितांचा समावेश असणाऱ्या या संग्रहाचा अभ्यास केल्यानंतर जाणवते की त्यांच्या कवितेतून महानगरी संवेदनशीलता व्यक्त होते. इंग्रजी शब्दांचा वापर आणि वेगळी प्रतिमासृष्टी हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. कवितेत 'टेलिफोन' 'स्ट्रेचर' अशा प्रतिमा पुन्हा पुन्हा येतात. अपघाती निधनाने हा तरूण कवी अकाली काळाच्या

पडद्याआड गेला. अन्यथा त्यांच्या कवितेचा विकास पुढे कसकसा होतो हे पहाणे मनोज्ञ ठरले असते.

१९८० नंतर लक्षणीय काव्यनिर्मिती करणाऱ्या कवीमध्ये नारायण कुलकर्णी-कवठेकर (हे माझ्या गवताच्या पात्या, १९८२), उत्तम कोळगावकर (जंगलझडी, १९८२) यांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागतो. मनातील भावना व्यक्त करताना येणारी ग्रामीण शब्दसृष्टी हे या कवींचे खास वैशिष्ट्य आहे. सभोवतालचा ग्रामीण परिसर, त्या परिसरातील लोकांच्या भावभावना खास त्यांच्याच शब्दात मांडणाऱ्या या कवींचा विचार आपण ग्रामीण कवितेच्या संदर्भात पुढे करणारच आहोत, पण केवळ ग्रामीण कवी म्हणून त्यांच्या कवितेचे मूल्यमापन करणे उचित नाही. महत्त्वपूर्ण जीवनविषयक जाणिवा आणि सामाजिक जाणिवा व्यक्त करणारी त्यांची कविता १९८० नंतरची मराठी काव्यधारा समृद्ध करताना दिसते.

नव्या पिढीच्या काव्यसंग्रहात महत्त्वपूर्ण असणारा काव्यसंग्रह म्हणजे 'गुरूनाथ सामंत' यांचा 'गुरूचरित्र' (१९८४) हा होय. अनुभवातून साकारलेली त्यांची कविता अधिकाधिक अनुभवनिष्ठ व जीवननिष्ठ असल्याचे दिसून येते. जीवनात येणारे दुःख कवी तन्मयतेने मांडताना दिसतो. वसंत पाटणकर (विजनातील कविता, १९८३), अशोक बागवे (आलम, १९८१) यांच्या कवितेतून शहरातल्या माणसाची संवेदनवृत्ती व्यक्त झाली आहे. महानगरी जीवन जगत असताना येणारे एकाकीपण, उदासपण, माणूस-माणसापासून दुरावल्याची भावना त्यांच्या कवितेतून व्यक्त होते. अशाच महानगरीय संवेदना व्यक्त करणाऱ्या कविता अनिल द्रविड यांच्या 'दिशांची पावले' (१९८१) या कवितासंग्रहात पहावयास मिळतात. या महानगरीय संवेदना व्यक्त करणाऱ्या कवींच्या अनुभवविश्वात व्यापकता व विविधता आहे.

या कवींशिवाय पुढील काही कवींचे काव्यसंग्रह नोंद घेण्यासारखे आहेत. सुधाकर गायधनी [देवदूत, (खंडकाव्य) १९८१] अरूण शेवते (सई मालवणकर, १९८४), अरूण म्हात्रे (ऋतू शहरातले, १९९१), अशोक नायगावकर (वाटेवरच्या कविता, १९९२)

अनुराधा पाटील, रजनी परूळेकर, नीरजा अशा दर्जेदार कविता लिहिणाऱ्या कवयित्रींनी १९८० नंतरचा कवितेचा प्रवाह संपन्न बनविण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या कवितेचे स्वरूप पुढे कवयित्रींच्या भावकवितेच्या अनुषंगाने पहावयाचे आहे.

१९८० नंतर काव्यलेखनाला सुरूवात केलेल्या कवींची कविता पुढे आणखी बहरेल. वेगवेगळ्या जाणिवा व्यक्त करणारी ही कविता अधिकाधिक चिंतनशील बनेल अशी आशा बाळण्यास वाव आहे. काही कवी मात्र एखादाच कविता संग्रह किंवा काही कविताच लिहून प्रसिद्धीच्या झोतात आलेले आहेत. त्यांच्याकडून आणखी लिहिण्याची व पहिल्या संग्रहातील दर्जा इतर कवितेत टिकविण्याची मात्र गरज आहे.

१९८० नंतरच्या कवी-कवयित्रींची संख्या अधिक असल्याने सगळ्यांचा एकत्र आढावा घेण्यास मर्यादा येतात. म्हणून त्यांच्या काव्याशयानुसार वेगवेगळ्या गटात विभाजन करून त्यांच्या कवितेचा विचार करणे सोयीचे ठरेल. यासाठी ग्रामीण कविता लिहिणारे कवी, विद्रोही कविता, कवयित्रींच्या कविता असे वेगवेगळे गट करून आधुनिक मराठी कवितेचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**ग्रामीण जीवन जाणिवा प्रकट करणारे कवी :**

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आपल्या भोवतीच्या परिसराकडे बारकाईने पाहून त्याला शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न कवितेतून मोठ्याप्रमाणात होऊ लागला. १९८० नंतर तर ग्रामीण कवितांना खरा बहर आला. ग्रामीण जनजीवनाचे चित्रण ग्रामीण कवी रेखाटू लागल्याने खेडे, खेड्यातील लोकांचे सुख-दुःख, परंपरा, रूढी, संस्कृती, कृषिजीवन

कवितेतून प्रतिबिंबीत होऊ लागले. १९८० नंतरच्या या ग्रामीण साहित्याच्या प्रवाहात महत्त्वपूर्ण भर टाकणाऱ्या कवीमध्ये विठ्ठल वाघ यांचा विचार अग्रक्रमाने करावा लागेल. 'काया मातीत मातीत', 'वैदर्भी', 'साय' हे त्यांचे कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. 'काया मातीत मातीत' (१९९१) हा सर्व कवितांचा समावेश असणारा संग्रह प्रसिद्ध झाला आहे. निसर्ग आणि श्रृंगार यांचा एक अनोखा मिलाफ त्यांच्या कवितेत पहावयास मिळतो. निसर्गाच्या सौंदर्यानुभवाच्या कविता व सामाजिक वास्तवाच्या कविता वाघ तितक्याच ताकदीने रेखाटताना दिसतात. ग्रामीण जनजीवन, कृषिव्यवसाय आणि ही शेती करणारा शेतकरी हा वाघांच्या कवितेचा केंद्रबिंदू ठरतो. विविध प्रतिमांनी सौंदर्यकविता फुलवणारा कवी शेतकऱ्याचे दु:ख व त्याच्यावर होणारा अन्याय पाहून प्रसंगी क्रांतीसाठी सज्ज होतो. 'तिफन' सारखी कविता पेरणीचे दृश्य डोळ्यासमोर उभे करते तर 'तिसरा डोया' सारखी कविता शेतात राबणारा बैल आणि बैलाप्रमाणे राबणारा शेतकरी यांची व्यथा मांडते. 'गाळ', 'मेंढर', 'आवक्के', 'म्हैस' अशा कवितातून स्वार्थी राजकारणी आणि भ्रष्ट झालेल्या राजकारणावर कवीने प्रकाश टाकला आहे. ग्रामीण जनतेचे भोळेपण व त्याचा फायदा घेणारे शासनकर्ते यांचे वर्णन वाघांच्या अनेक कवितेत आले आहे. 'म्हैस' कवितेत तर उपहासगर्भ भाषेत त्यांनी केलेले वर्णन पहा.

> ''येरे येरे पावसा म्हणून पाऊस आला मोठा नाई,
> पैसा झाला खोटा नाई, दुधान भरला लोटा नाई,
> पोट्टे मांगतात दूध दही, माय लावते बयाच रई,
> घुसळन घातलं बाई, लोणी येत का नाई ?''[११]

('म्हैस', का.मा.मा., पृ.३४)

लोकभाषेचा वापर लोकानुभवाचा अविष्कार, गेयतेची साथ, अनोख्या ग्रामीण प्रतिमांचा यथार्थ वापर ही विठ्ठल वाघ यांच्या काव्याची वैशिष्ट्ये सांगता येतील. १९८० नंतरच्या ग्रामीण कवीत त्यांचे स्थान उच्च आहे.

**नारायण कुलकर्णी–कवठेकर :**

नारायण कुलकर्णी–कवठेकर यांचा 'हे माझ्या गवताच्या पात्या' हा पहिला कविता संग्रह ऑगस्ट, १९८२ मध्ये मौज प्रकाशन गृहाने प्रकाशित केला. ग्रामीण जीवनानुभव व सामाजिक वास्तव यांचा अनोखा संगम त्यांच्या कवितेत पहावयास मिळतो. 'गाव', 'झाड', 'नंदीबैल', 'जमीन' या त्यांच्या महत्त्वपूर्ण ग्रामीण कविता. त्यांच्या कवितेतील अनुभवाचा सच्चेपणा आणि प्रतिमेचे सामर्थ्य वैशिष्ट्यपूर्ण जाणवते. समाजजीवन, राजकारण आणि ग्रामीण लोकांचे जीवनमान याभोवती त्यांची कविता फिरत राहते. सामाजिक जाणिवांचा समर्थ आविष्कार करणारी कविता हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य होय. 'मागील पानावरून पुढे सुरू' (१९९७) हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह. जिवंत जिवनानुभव आणि जळजळीत सत्य मांडण्याची निष्ठा, उपरोधपूर्ण शैली यामुळे त्यांची कविता उठून दिसते. राजकीय व सामाजिक भान ठेवून लिहिणारा कवी म्हणून नारायण कुलकर्णी–कवठेकरांचा विचार करावा लागतो.

**उत्तम कोळगावकर :**

उत्तम कोळगावकर यांचा 'जंगलझडी' (१९८२) हा काव्यसंग्रह मौज प्रकाशन गृहाने प्रकाशित केला. उत्तम कोळगावकरांनी आपल्या कवितेत ग्रामीण प्रतिमांचा मोठ्या प्रमाणात वापर केलेला आहे. मात्र त्यांची कविता केवळ ग्रामीण जीवनचित्रण करणारी नाही. माणसाची संपत चाललेली निर्मिती प्रेरणा, एकारलेपणाची जाणीव, निराशेचा सूर यामुळे त्यांची कविता १९८० नंतरची महत्त्वपूर्ण भावकविता ठरली आहे. 'म्हाताऱ्याचं काळीज', 'बाप', 'आई', 'चंद्र निघून जात असेल' या त्यांच्या महत्त्वपूर्ण कवित होत.

**नारायण सुमंत :**

निसर्ग आणि वास्तववादी कवितेचा एक अनोखा मिलाफ सुमंतांच्या कवितेत पहावयास मिळतो. 'रानभैरी' (१९८३), 'वृक्षवेद' (१९९३), 'सातबारा' (२००२) हे त्यांचे प्रसिद्ध कवितासंग्रह. ग्रामीण बोलीचा वापर, लोकसंस्कृती व ग्रामसंस्कृती यांच्या खुणामुळे सुमंत यांच्या काव्याची आशयघनता वाढते. फक्त झाडावर १२५ कविता लिहिणारा हा एक अनोखा कवी. झाडाचे महत्त्व सांगताना ते लिहितात,

> ''झाडे एकच गुन्हा करतात,
>
> आभाळभर हात पसरून
>
> आयुष्यभर पाऊस मागतात
>
> आणि –
>
> तोंडणाऱ्यांच्या चुलींसाठी
>
> पानोपानी
>
> वाढत जातात !''[१२]

'पाऊस', 'भरवसा' या त्यांच्या महत्त्वपूर्ण कविता. लयबद्ध रचनेमुळे गेयतेची जोड कवितेला लाभलेली आहे.

**इंद्रजित भालेराव :**

१९८० नंतरच्या ग्रामीण कवितेतील एक महत्त्वपूर्ण कवी म्हणून इंद्रजित भालेरावांचा उल्लेख करावा लागेल. पहिल्याच काव्यसंग्रहात प्रसिद्ध होण्याचे भाग्य लाभलेल्या या कवीने ग्रामीण जीवनानुभव अतिशय ताकदीने रेखाटले आहेत. 'पीकपाणी' (१९८९), 'आम्ही काबाडाचे धनी' (१९९२), 'दूर राहिला गाव'

(१९९४), 'कुळंबिणीची कहानी' (१९९८) हे त्यांचे प्रसिद्ध काव्यसंग्रह. अभंग, ओवी, छंदाचा समर्थपणे वापर केलेली त्यांची कविता वाचकाला अस्सल जीवनानुभव देणारी आहे. मातीचे महत्त्व सांगताना ते लिहितात –

''मातीसटीच जगावं

मातीसटीच मराव

माती लई थोर

तिला कसं इसरावं''[१३]

पीकपाणी संग्रहाबद्दल नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, ''तरल निसर्गाविष्कार आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व यामुळे त्यांची कविता लक्षणीय ठरली. पंरतु त्याबरोबर हेही लक्षात आले की, या कवीला आपल्या सर्व परंपरांचे फार उत्तम भान आहे. जीवनातल्या, संस्कृतीतल्या आणि मराठी कवितेच्या परंपरांचे भान त्यांनी आपल्या काव्यलेखनातून फार उत्तम रीतीने प्रकट केले आहे.''[१४]

गाव, गावातली माणसं, गावचा परिसर, संस्कृती, रूढी-परंपरा, भोवतालची शेती, तिथं येणारी पिकं, ग्रामीण माणसाची निसर्गाशी असणारी एकरुपता, शेतकऱ्याच्या वाट्याला आलेलं जीवन अशा विविध विषयांना त्यांची कविता साकार करते. त्यांच्या कवितेला स्वतःची खास शैली आणि लय लाभलेली आहे. इंद्रजित भालेरावांची कविता मराठी ग्रामीण कवितेचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

**फ.म. शहाजिंदे :**

'निधर्मी' (१९७९), 'आदम' (१९९१), 'शेतकरी' (१९८५) ही त्यांची काव्यसंपदा. 'शेतकरी' या खंडकाव्यातून त्यांनी शेतकऱ्याच्या व्यथा-वेदना स्पष्ट केल्या आहेत. व्यापाऱ्यांची स्वार्थी प्रवृत्ती, पुढाऱ्यांचा भ्रष्टाचार, शेतकऱ्याचे परावलंबी जीवन

याचे जिवंत चित्रण या खंडकाव्यात झालेले आहे. शेतकऱ्यांचा संपूर्ण जीवनपट डोळ्यासमोर उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या या काव्यात आहे.

त्यांनी लिहिलेल्या सामाजिक जाणिवेच्या कविताही महत्त्वपूर्ण आहेत. या धर्मनिरपेक्ष देशात कोणालाही 'माणूस' म्हणून जगता येत नाही ही खंत मांडताना कवी लिहितात,

"अरे बाबा, समुहाला खडसावणाऱ्यांच्या नशिबी उत्सव नसतात
ते समुहाला गोंजारणाऱ्यांच्या नशिबी असतात
मग मला सांग तुझ्या नशिबी उत्सव कसले असणार ?
नुसतं माणूस असणं बरं नसतं राजा !
कारण तो दोन्हीकडून ठेचकाळत राहतो रे !"[१५]

.सामान्यांची, शेतकऱ्याची व निधर्मीवादी लोकांची दु:खे कवीने अतिशय ताकदीने मांडली आहेत.

**मोहन पाटील :**

'गाव आणि मातेच्या कविता' (१९८२) या काव्यसंग्रहातून ग्रामजीवन रेखाटले आहे. या संग्रहात एकूण अडतीस कविता आहेत. कवीने त्याचे स्फुट आणि मातेच्या असे दोन विभाग केलेले आढळतात. आनंद यादवांच्या परंपरेशी नाते सांगणारी ही कविता भावनाप्रधान आणि प्रांजळ आहे. प्रतिमांच्या विभ्रमापेक्षा कवीने भावनात्मकतेला अधिक महत्त्व दिलेले आहे. याशिवाय दा.र. दळवी यांचा 'मालवणी खाजा' (१९८६), उषा भालेराव यांचा 'रानकामुन्या' (१९८६) , शंकर वाडेवाले यांचा 'कढवाही' (१९८८), भास्कर बडे यांचा 'वावर' (१९८९), गोविंद थेटे यांचा 'गाणे मातीचे' (१९८९), आबा गणपती यांचा 'भरजारी शाप', एस.एस. शिंदे यांचा 'सर्वा' (१९८३)

इ. १९८० नंतरचे महत्त्वपूर्ण ग्रामीण कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. या कवितेतून अनेक ग्रामजीवन विषयक अनुभव स्पष्ट झाले. ग्रामीण कवितेने अनुभवाचा सच्चेपणा आणि भाषेतील जिवंतपणा मराठी कवितेत रूजवला.

ग्रामीण कवितेचा प्रवाह १९८० नंतर अधिकाधिक गतिमान होताना दिसतो आहे. १९७५ पूर्वी लिहिणाऱ्या कवींचे काव्यसंग्रह १९८० नंतर प्रसिद्ध होताना दिसतात. अनेक कवी नव्या जाणिवेने ग्रामीण जनजीवन काव्यांत आणू लागले. नवनव्या प्रतिमा, नव्या शब्दकळा, नवे अनुभवविश्व या कवितेतून साकारू लागले. ग्रामीण लोकांचे नवनवे प्रश्न, पुढाऱ्यांकडून होणारी फसवणूक, फसव्या योजना, मागासलेले जनजीवन याचे चित्र या कवितेतून पुढे आणले.

१९८० नंतरची ग्रामीण कविता कलात्मकतेच्यादृष्टीने दर्जेदार आहे. निसर्ग व सामाजिक वास्तव याचा एक अनोखा मिलाप या कवितेत पहावयास मिळतो. गेयतेचा बाज, नवी प्रतिमासृष्टी, रचनेच्या प्रकारातील विविधता यामुळे ही कविता सरस वाटते. १९८० नंतरच्या नव्या पिढीत इंद्रजित भालेरावांची कविता अधिक कलात्मक व दर्जेदार वाटते.

'ज्ञानेश्वर कोळी' हे या पिढीतील ग्रामीण वास्तव साकारणारे एक ठळक नाव आहे. केवळ ग्रामीण कविता म्हणून त्यांच्या कवितेचा विचार करणे मात्र योग्य वाटत नाही. कोळींच्या कवितेतील समाजवास्तव व घटना या केवळ ग्रामीण भागापुरत्या मर्यादित रहात नाहीत. बदलते मानवी जीवन, शहरातल्या माणसांची अवस्थाही ते अधिक परिणामकारकपणे रेखाटतात. शहरातला बाजार, मुकपणे जगणारी माणसे, भिकाऱ्याची आर्तता, आधुनिकीकरण या विषयी त्यांनी अनेक कविता लिहिलेल्या आहेत.

ज्या कवितातून 'कोळींनी' ग्रामीण जीवन साकारण्याचा प्रयत्न केला आहे त्या कविताही मूल्यदृष्ट्या सरस ठरतात. ग्रामीण माणसांची दु:खे, परिसर, छळणारा निसर्ग, येणारी संकटे, बदलते खेडे, वाढती स्वार्थी प्रवृत्ती, राजकारण, स्त्री-जीवन, जनावरांची दुष्काळात होणारी अवस्था, पशूपक्षी त्यांच्या कवितेत येतात. ग्रामीण भागातील विपूल म्हणी व वाक्प्रचारही त्यांच्या कवितेत आलेले आहेत ग्रामीण परिसरातील पाहिलेले अनुभव शब्दबद्ध करण्यात कवी पूर्णपणे यशस्वी ठरलेले आहेत. त्यांच्या ग्रामीण भाषेचा परिणाम कितपत रसिकावर होतो त्याचा अभ्यास पुढे त्यांच्या कवितेच्या अभिव्यक्तीबाबत करावयाचा आहे.

अशाप्रकारे १९८० नंतरचा ग्रामीण कवितेचा प्रवाह अधिक समृद्ध गतिमान होत आहे. अभिव्यक्ती व आशयाच्या दृष्टीने ग्रामीण कविता दर्जेदार बनते आहे.

## १९८० नंतरची विद्रोही कविता :

१९७० ते १९७५ या काळात दलित कवितेने मराठी कवितेचे क्षेत्र ढवळून काढले. एका दुर्लक्षित जगाची ओळख साहित्यातून होऊ लागली. माणसाला माणसासारखे न जगू देणाऱ्या समाजाबद्दल, समाजव्यवस्थेबद्दल आणि मानसिकतेबद्दल तीव्र चीड, संताप साहित्यातून व्यक्त होऊ लागला. कोंडलेल्या-दबलेल्या, मूक राहिलेल्या भावनेला वाट मिळाली. 'नामदेव ढसाळ', 'यशवंत मनोहर', 'शरणकुमार लिंबाळे', 'वामन निंबाळकर', 'अर्जुन डांगळे', 'रविचंद्र हडसनकर', 'गजमल माळी', 'केशव मेश्राम' असे अनेक कवी आपल्यावरील, आपल्या समाजावरील अन्यायाविरूद्ध लेखणी परजू लागले. स्वत:चे अनुभव आणि भाषा यामुळे मराठी कवितेला आजपर्यंत अपरिचित असणारे नवे जग दलित कवितेतून अभिव्यक्त होऊ लागले. दलित कवितेचा हा प्रवाह म्हणजे मराठी साहित्याला लाभलेला सामाजिक जाणिवांचा आणि

आत्मानुभवाचा ख़जिनाच म्हणावा लागेल. १९८० नंतरच्या विद्रोही कविता लिहिणाऱ्या महत्त्व पूर्ण कवींचा विचार पुढील प्रमाणे करता येईल.

'लोकनाथ यशवंत' यांचे 'आता होऊन जाऊ द्या', 'शेवटी काय झाले' हे कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. भुजंग मेश्राम यांच्या 'उलगुलान' (१९९०) या कवितासंग्रहातून आदिवासी लोकांचे दुःख समाजासमोर आले. वाहरू सोनावने यांच्या 'गोधड' (१९८७) या कवितासंग्रहातून आदिवासींच्या दुःखमय गुलामगिरीचा इतिहास मांडला गेला.

'अरूण काळे' यांच्या 'रॉक गार्डन' (१९९३) 'सायरनचे शहर' (१९९७) या संग्रहातून दंगल, दहशत, दडपशाही, दांभिकता या वास्तव गोष्टींचे भयानक रूप उघडे झाले.

'लहू कानडे' यांच्या 'टाचटिभा' (१९९६), 'क्रांतीपर्व' (१९९२) मधून अस्पृश्यतेचा दाहक अनुभव आणि जातीव्यवस्थेने दिलेल्या दुःखद कहाणीची उकल होते. आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या अस्पृश्यतेविषयी ते लिहितात,

"आठवून हाल

रडायचा बाप

चावायचे साप

जातीचेच"[१६]

माधव सरकुंडे यांच्या 'मनोगत' (१९९७) या काव्यसंग्रहातून आत्मभान आणि आत्मशोध यांचे समर्थ रूप पहावयास मिळते.

कृष्णा निर्मळे यांच्या 'पाणुता' (२००३), 'येस' (२००५) या काव्यसंग्रहातून आपल्या उपेक्षित समाजाचे दु:ख शब्दरूप झाले आहे. त्यांच्या कवितेत बंडाची, क्रांतीची भाषा दिसते. आपल्या 'पाणुता' कवितेत ते लिहितात –

"पाणुत्यांची वेदना

पापण्यांच्या पाण्यानेही मिटेना

पाण उतारा मात्र थांबेना"[१७]

ज्योती लांजेवार यांच्या 'दिशा' (१९८२) या संग्रहातून स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या दु:खाचे विविध पदर पहावयास मिळतात. याशिवाय 'फिर्याद' (हिरा बनसोडे), 'विद्रोह' (उत्तम बावस्कर) 'उन्हातलं झाड' (भगवान भोईर), 'उच्छेद' (बबन चहांदे), 'ओल्या जखमा' (ल.स. रोकडे) इ. विद्रोही कवितांचे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. या दलित कवितेविषयीं रवींद्र घवी लिहितात,

"आज प्रस्थापित कवितेतील एक धारा निव्वळ प्रयोगवादात रमलेली आहे. दलित कविता अशी प्रयोगवाद आणि पराभूतता यात रमलेली नाही. ती अस्सल भारतीय जाणिवांनी निर्माण होत आहे. ती आपले स्वत्व राखून नवी कलात्मक शिखरे गाठू शकेल असा विश्वास वाटतो."[१८]

आणि खरोखरच आपले स्वत्व राखून दलित कवितेने मराठी कवितेत सामाजिक जाणिवांची जिवंत कविता साकारली. या कवितेतून स्त्रीमन आणि आदिवासी दु:खाचेही दर्शन घडले. याविषयी रवींद्र ठाकूर लिहितात,

"१९८०-८५ च्या सुमारास विद्रोही कवितेस हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, मीना गजभिये, सुरेखा भगत यांच्या कवितेच्या रूपाने दलित स्त्री जीवनाचा संदर्भ लाभला

आणि त्याचबरोबर वाहरू सोनवणे, भुजंग मेश्राम यांच्या कवितेच्या रूपाने आदिवासी जीवनजाणिवेचा स्पर्श लाभला. आजवर अंधारात असलेले दलित स्त्रीमन आणि आदिवासी जनजीवन या कवितेतून अविष्कृत होताना दिसते.''[११] दलित स्त्रीमन आणि आदिवासी दु:खाची ओळख १९८० नंतरच्या दलित कवितेतून झाली आहे. मात्र नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, दया पवार यांच्या कवितेतील कलात्मक दर्जा १९८० नंतर लिहिणाऱ्या विद्रोही कवींच्या कवितेत क्वचितच पहावयास मिळतो.

आपल्यावर होणाऱ्या अन्याया विरूद्धचा संताप आणि जातीव्यवस्थे विषयी विद्रोह व्यक्त करताना १९८० नंतरची दलित कविता काहीशी अनुकरणीय वाटते. पूर्वीच्या कवींचा सूरच त्यांच्या कवितेत पुन्हा उमटलेला दिसतो. काही कवींच्या कवितेत कलात्मकतेचा अभावही जाणवतो.

नवे अनुभवविश्व, नव्या प्रतिमा, नव्या शब्दकळा, याविषयीचा दलित कवितेचा पहिल्या पिढीचा जोम १९८० नंतरच्या कवितेत मात्र दिसत नाही. आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी दलित कवी काही वेळा फारच भडक भाषा वापरू लागल्याचे दिसून येते. तेच-ते अनुभव, मांडण्याची पद्धती तिच-ती त्यामुळे पुढे-पुढे दलित कविता कंटाळवाणी वाटू लागली.

बहुसंख्य दलित कवी नामदेव ढसाळ, सुर्वे यांच्या कवितेचे अनुकरण करताना दिसतात. त्यामुळे कवितेत नवी कल्पकता क्वचितच पहावयास मिळते. आहे तसे वास्तव साकारण्याच्या अट्टाहासामुळे काही ठिकाणी कलात्मक दर्जा ढासळलेलाही दिसतो. दलित कवितेत आलेला हा एकसूरीपणा निघून जावून जिवंत, सजीव अनुभवाने रेखाटलेली संयमी कविता निर्माण होईल अशी आशा बाळगणेच सध्या योग्य ठरेल.

१९८० नंतरच्या विद्रोही कवितेचे स्वरूप त्या पूर्वीच्या कवितेपेक्षा किंवा त्या कवितेच्या तुलनेत फारसे समाधानकारक नाही असेच म्हणावे लागेल. परंतु पुढे मात्र या नवोदित पिढीकडून उल्लेखनीय काव्यनिर्मिती होईल असे लोकनाथ यशवंत, भुजंग मेश्राम यांच्या कवितेचा अभ्यास केल्यांनतर वाटते. अनेक नवीन कवी विद्रोही कविता लिहित आहेत. अर्थात कलात्मकदृष्ट्या कमतरता असली तरी निर्मिती मात्र खंडीत झाली नाही. विपूल साहित्य निर्माण होऊन विद्रोही कवितेच्या प्रवाहात भर पडतच आहे.

आत्मभान, आत्मशोध, क्रांतीकारी भाषा, अस्सल जीवन–अनुभव सजगता यांची देणगी मराठी कवितेला देणाऱ्या विद्रोही कवितेचे मराठी काव्य प्रवाहातील योगदान निश्चितच महत्त्वपूर्ण व वादातीत आहे.

**१९८० नंतरची भावकविता/कवयित्रींचे योगदान :**

१९८० पूर्वी लिखानाला सुरवात करूनही ज्यांची कविता १९८० नंतर काव्यसंग्रहाच्या रूपाने प्रसिद्ध झाली अशा प्रमुख कवयित्रींच्या कवितेचा विचार येथे करावयाचा आहे. १९८० नंतरच्या कवितेमध्ये महत्त्वपूर्ण भर टाकणारे नाव म्हणजे कवयित्री 'अनुराधा पाटील' हे होय. 'दिगंत' (१९८१), 'तरीही' (१९८५), 'दिवसेंदिवस' (१९९२) इ. त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.

प्रेमानुभवाशी संबंधित असणारी त्यांची कविता दुःखानुभव प्रकट करणारी व अधिकाधिक चिंतनशील बनलेली कविता आहे. स्त्री जीवनाच्या विविध छटा त्यांच्या कवितेतून व्यक्त होत असल्या तरी त्यांची कविता केवळ स्त्री–जीवनाभोवती फिरणारी नाही.

दुःखाचा स्वीकार करतानाही दाखवलेला समजुतदारपणा, आलेल्या दुःखातही बाळगलेला आशावाद, मनुष्य जीवनातील एकाकीपणा, मनाची घुसमट त्यांच्या अनेक कवितेतून व्यक्त होते. सरळ, सोपी, मनाला भिडणारी रचना हे त्यांच्या कवितेचे

वैशिष्ट्य आहे. त्यांच्या कवितेत संवादात्मकता आहे. प्रतिमा व प्रतिकांची विपुलता आहे.

अनेक जीवन-जाणिवा स्पष्ट करणारी, भावनांचे विविध पदर प्रकट करणारी, अनुभव विश्वाने समृद्ध असणारी अनुराधा पाटील यांची कविता १९८० नंतरच्या मराठी काव्य प्रवाहात महत्त्वपूर्ण भर टाकणारी, उल्लेखनीय कविता आहे.

१९७० नंतर काव्यलिखानाला सुरवात करून ज्यांच्या कविता १९८० नंतर संग्रहरूपाने प्रसिद्ध झाल्या त्या महत्त्वपूर्ण कवयित्री म्हणजे 'रजनी परूळेकर' होय.

'स्वीकार' (१९९३), 'काही दीर्घ कविता' (१९९९) हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कवितेतून स्त्रीची विटंबना, शोषण, मानहानी, दुःखाचे आक्रोश यांना वाचा फुटलेली आहे. स्त्रीच्या संवेदनशीलतेचा अनुभव व्यक्त करणारी त्यांची कविता आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने अतिशय ताकदीची सरस कविता आहे. त्यांच्या कवितेतून जरी स्त्रीमन प्रकट होत असले तरी कविता केवळ स्त्री-जीवनाची आहे असे मात्र म्हणता येत नाही. सर्वच मानवी जीवन-जाणिवांचे सखोल चिंतन त्यांच्या कवितातून पहायला मिळते. आधुनिक काव्यक्षेत्रामध्ये कवयित्री परूळेकर यांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

'अरूणा ढेरे' हे कवयित्रींच्या नव्या पिढीतील एक महत्त्वपूर्ण नाव आहे. 'आरंभ' (१९८५), 'अक्षरात्रा' (१९८७), 'मंत्राक्षर' (१९९०), 'निरंजन' (१९९०) हे त्यांचे प्रसिद्ध कवितासंग्रह. स्त्री-जीवनातील दुःखाचे दर्शन कवयित्रीने आपल्या कवितेतून घडवले आहे. तरल संवेदनशीलता हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

याशिवाय 'नीरजा' (वेणा), 'अंजली कुलकर्णी' (मी एक स्त्रीजातीय अस्वस्थ आत्मा), 'शैला सायनाकर' (कवितासायलीची), 'प्रज्ञा लोखंडे' ('सलाम', 'बाँबे',

'महानगर', 'अंतस्थ'), 'योगिनी जोगळेकर', 'सुहासिनी इर्लेकर', 'अनुराधा वैद्य', 'संजिवनी बोकील' यांनी मराठी काव्यपरंपरेत महत्त्वाची भर टाकली.

१९८० नंतर अनेक कवयित्रींच्या कवितेतून स्त्रीजीवन चित्रित होऊ लागले. स्त्रियांच्या व्यथा-वेदना, मनाची घुसमट, सोसावे लागणारे दुःख या कवयित्रींच्या कवितेतून शब्दरूप घेऊ लागले.

'अनुराधा पाटील', 'रजनी परूळेकर', 'नीरजा' या कवयित्रींची कविता नव्या पिढीतील 'सरस' कविता आहे. १९८० नंतरच्या काव्यात या कवयित्रींच्या कवितेची लक्षणीय भर पडलेली आहे. ही कविता केवळ स्त्री-वादी ठरत नाही तर एकूण मानवी जीवन व्यवहाराला व्यापणारी संवेदनशील, चिंतनगर्भ कविता आहे. अनुभव समृद्धता हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

वरील कवयित्रींशिवाय अनेकनावे अशी पहावयास मिळतात की, ज्यांचा एखादाच कवितासंग्रह प्रसिद्ध झालेला आहे, मात्र कलात्मक दृष्ट्या कविता दर्जेदार आहे तर पुष्कळ नावे अशी आहेत की कविता विपूल प्रमाणात लिहूनही कलात्मकतेचा मात्र अभाव आहे. केवळ स्त्रीवादी कवितांचा संग्रहही काही कवयित्रींनी प्रसिद्ध केलेला दिसतो.

थोडक्यात १९८० नंतरचा मराठी काव्याचा प्रवाह समृद्ध करण्यामध्ये कवयित्रींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. स्त्री जीवनाचे नवे जग या कवितेतून समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न या काव्यातून होत आहे. मात्र या काव्याची मर्यादा म्हणावी लागेल की हे स्त्रीजीवन सर्व समावेशक नाही. सर्व स्तरातील मागासलेल्या, उपेक्षित, दुर्लक्षित स्त्री जीवनावर म्हणावा तसा प्रकाश पडलेला नाही. ठराविक स्त्री-समस्या व वर्गाभोवतीच हे चित्रण फिरताना दिसते.

## ४) १९८० नंतरच्या कवितेचे स्वरूप-विशेष :

१९८० नंतरच्या कवितेचे स्वरूप अभ्यासल्यानंतर पुढील वैशिष्ट्ये निदर्शनास येतात-

१९८० नंतरच्या कवितेत विविध काव्यप्रवाह समृद्ध होत आहेत. उदा. विद्रोही कविता, ग्रामीण कविता, आदिवासी, स्त्रीवादी, अनेक नवोदित कवी या प्रवाहात आपापल्या परीने काव्यलेखनाचे योगदान देताना दिसतात.

१९८० नंतरच्या कवितेचे एकंदरीत स्वरूप संमिश्र आहे. एकाच वेळी आशय आणि विषयाची, रचनेची, अभिव्यक्तीची विविध रूपे वाचकासमोर येत आहेत.

१९८० नंतरच्या कवितेतून अधिकाधिक सामाजिक व जीवनविषयक जाणिवा प्रकट होत आहेत. समाजातील प्रश्न, समस्यांना कवितेतून वाचा फुटू लागल्याचे दिसते.

रचनेच्या दृष्टीने ही नवकविता वैविध्यपूर्ण आहे. काव्यरचनेचे वेगवेगळे प्रकार नवकवी हाताळत आहेत. मुक्तछंद, ओवी, अभंगापासून गझल, हायकू, रूबाई सारख्या रचनाही पहावयास मिळतात. तसेच विषयाच्या बाबतीतही व्यापकता जाणवते. सामाजिक,राजकीय, जीवनविषयक, काव्यविषयक, निसर्गकविता, प्रेमकाव्य, विडंबन, अध्यात्मपर, गुढवादी, विज्ञान काव्य अशा विविध विषयावर विपूल काव्यरचना होत आहे.

१९८० नंतरची कविता आत्मशोधाची कविता आहे. स्वत:चे आयुष्य व अनुभव, प्रसंग अनेक कवी आपल्या कवितेतून मांडत आहेत. मानवी जीवनातील सुख-दु:खा भोवती अनेक कविता फिरताना दिसतात. ही नवकविता क्रांतीची भाषा बोलते. असणारे भीषण वास्तव बदलण्यासाठी परिवर्तनाची आस बाळगते. अन्यायकारक परंपरेच्या विरोधात, शोषण करणाऱ्या वर्गाविरूद्ध, फसवणाऱ्या राजकीय व्यक्ती व

समाजातील वर्गाविरूद्ध बंड करणारी ही कविता अधिक क्रांतीकारी वाटते. ज्या अन्यायकारक बंधनात, रूढीत, नात्यात आपण अडकलो आहोत त्याचे पाश तोडण्यासाठी निर्माण झालेले भान या कवितेत पहावयास मिळते.

१९८० नंतरच्या कवितेविषयी लिहिताना वसंत आबाजी डहाके लिहितात, "१९८० नंतरच्या मराठी कवितेत वर्ग, धर्म, लिंग या चारही पातळ्यावरील विरोधात्म/विसंवादात्म अनुभवाचं चित्रण आढळतं. हे कोंडलेलं आभाळ जरा मोकळं व्हावं, अशांत आसमंत शांत प्रसन्न होऊन जावा अशी आसही काही कवितातून आढळते."[२०] विद्रोही कविता, स्त्रीवादी कविता, आदिवासी कवितेतून डहाके यांच्या मताचा अधिक प्रत्यय येतो.

१९८० नंतरची कविता आणि जीवन यातले अंतर जवळ जवळ नष्ट होत आहे. कारण कवितेतून एकंदर जीवनप्रवासच मांडला जात आहे. मनाची अस्वस्थता, दु:ख, घुसमट व्यक्त करण्यासाठी कवितेचा वापर होत आहे.

बहुसंख्य कविता या संवादात्मक आढळतात. कवितेशी, विधात्याशी, मनाशी प्रसंगी दु:खाशीही हा संवाद आहे. या संवादात दु:खाची जाणीव आहे. वेदनेचा सूर आहे. मात्र तक्रारीची भावना नसून संघर्षाची उमेद पहावयास मिळते.

जीवन जाणिवांच्या बाबतीत नव्या पिढीची कविता अधिक सतर्क व सजग आहे. मानवी अस्तित्त्वाची निरर्थकता अनेक कवितांच्या केंद्रस्थानी असल्याचे जाणवते. मनाचा तळ शोधण्याचा तसेच अस्तित्वभान प्रकट करण्याचा प्रयत्न अनेक कवींच्या कवितेतून झाला आहे.

शिक्षणाचा प्रसार, प्रसारमाध्यमांचे जाळे, विविध ठिकाणी नव्याने निर्माण झालेली प्रकाशनगृहे, ठिकठिकाणी होणारी कविसंमेलने यामुळे १९८० नंतरच्या काव्यलेखनाला

चालना मिळाली आहे. आपल्या व्यथा-वेदना मांडण्यासाठी नवोदित कवी कवितेचा आधार घेताना दिसतात.

कलात्मक दर्जा नसणारे अनेक कवितासंग्रही प्रसिद्ध झाल्याचे दिसते. केवळ हौसेसाठी लिहिणारे हे कवी समाजात नावारूपाला मात्र येत नाहीत. उलट एखादाच काव्यसंग्रह किंवा केवळ काही कविता लिहून प्रतिष्ठा पावलेले काही कवीही पहावयास मिळतात. काव्यसंग्रहास मिळणाऱ्या अनुदानाचा फायदाही अनेक नवकवींना होत असल्याचे दिसते.

एकंदरीत १९८० नंतरची कविता संख्येच्या दृष्टीने विपुल आहेच शिवाय कलात्मक दर्जाही चांगला आहे. काही कवींच्या कविता तर मरगळलेल्या मनाला शक्ती देणाऱ्या आहेत. समाजातील जळजळीत वास्तव कवितेतून मांडून बंड करणाऱ्या आहेत.

'ज्ञानेश्वर कोळींची' कविता ही या नवकाव्याचे प्रतिनिधीत्व करणारी कविता आहे. सतर्क आणि संवेदनशील असणारी त्यांची कविता जगण्या भोगण्यातून आलेली आहे. सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या या कवितेचा सविस्तर अभ्यास पुढील प्रकरणात आलेला आहे.

## ५) १९८० नंतरच्या काव्याचे वेगळेपण :

१९८० नंतरची कविता अधिक वस्तुनिष्ठ व समाजनिष्ठ बनलेली आहे. अनेक सामाजिक जाणिवा या कवितेतून व्यक्त होतात. समाज जीवनातील वाढता भोगवाद, चंगळवाद, भ्रष्टाचार, नैतिक मूल्यांची घसरण या सर्व गोष्टींवर १९८० नंतरची कविता मोठ्या प्रमाणात प्रकाश टाकते. पूर्वीच्या भावकवितेपेक्षा या आधुनिक कवितेचे आशयविश्व वेगळे आहे. जीवन जगत असताना भोगाव्या लागणाऱ्या यातना, वेदनेचे जग, भूकेचा प्रश्न, दारिद्रय, उपासमार या गोष्टी नवकवितेच्या केंद्रस्थानी आहेत.

समाजाकडून, राजकारण्यांकडून, नातेसंबंधाकडून, मानवजातीकडून केलेल्या अपेक्षा व पदरी पडलेला फोलपणा अनेक कवितातून पहावयास मिळतो.

ही कविता त्याच त्या वर्तुळात फिरणारी, अनुकरण करणारी कविता नसून नवनव्या संकल्पना मांडून पूर्वीच्या आवर्तांना छेद देणारी नव्या जाणिवेची व संवेदनेची कविता आहे.

मुक्तछंदातून मोठ्या प्रमाणात अवतरणारी ही कविता काव्यरचनेच्या संकेताना झुगारून देते. नवनवे शब्द, नवनव्या प्रतिमा-प्रतिके व रूपकांचा वापर या कवितेत होत आहे.

१९८० नंतरची कविता आशयविषयाच्या बाबतीत नव्या संकल्पना उभी करणारी आहे. स्वत:ची निश्चित ओळख या कवितेने करून दिली आहे. हे नवकवी आपली भूमिका अधिक ठोसपणे मांडताना दिसतात. स्त्रीवादी कविता, विद्रोही कविता, झाडाच्या कविता, गावाच्या कविता असे एकाच विषयावर संग्रह प्रसिद्ध करण्याचे अभिनव प्रयोग या नवकवींकडून होतो आहे.

गझल, रूबाया, हायकू या सारखे रचना प्रकार हाताळण्याचा प्रयोगही नवकवितेत झाला असला तरी इतर रचना प्रकाराच्या मानाने तो अपवादात्मक आढळतो. गझल हा काव्यप्रकार काही प्रमाणात लोकप्रिय झालेला दिसतो. तसेच नवकवींच्या गझल लेखनावर सुरेश भटांचा प्रभाव जाणवतो.

१९८० नंतरच्या कवितेवर कोण्या एका कवीची ठळक नाममुद्रा आढळत नाही. (उदा. केशवसुत, मर्ढेकरयुग) तर अनेक कवींच्या एकत्रित योगदानामुळे हा काव्यप्रवाह समृद्ध झाल्याचे आढळते.

आत्मशोध,आत्मभान, जागृतता, परिवर्तनाची आस, वास्तवतेची प्रखर मांडणी, सामाजिक जाणिवा, जीवनानुभवाची मांडणी या बाबतीत १९८० नंतरची कविता स्वत:चा ठसा उमटवणारी, आपले स्वतंत्र स्थान निर्माण करणारी समर्थ कविता आहे.

**६) १९८० नंतरच्या कवितेचे विशेष व मर्यादा :**

१९८० नंतरची कविता आशय व अभिव्यक्तीच्या बाबतीत विविधता व व्यापकता आणणारी आहे. अभिव्यक्तीचे नवनवे प्रयोग या नवकवींनी केले. तसेच विविध रचनाप्रकार हातळले व आशयविश्वाच्या कक्षा रूंदावल्या. १९८० नंतरची कविता आत्मशोध घेते. कवीचे जीवन या काव्यातून साकारले आहे. विद्रोही व स्त्रीवादी कवितेतील आत्मशोध व आत्मभान स्पष्टपणे जाणवणारे आहे.

१९८० नंतरच्या कवितेतून वास्तव चित्रण घडते आहे. समाजातील स्थित्यंतरे, जीवनातील घटना, निसर्ग याचे वास्तववादी वर्णन या कवितेतून घडते आहे. तसेच ही कविता सामाजिक बदलाची नोंद घेणारी आहे. नवकवितेतून क्रांतीचा सूर उमटतो व असणारी वास्तव स्थिती बदलण्यासाठी, परिवर्तन करण्यासाठी कवी क्रांतीची भाषा बोलताना दिसतात. आजपर्यंत उपेक्षित राहिलेले घटक स्वत:च्या वेदना स्वत: कवितेतून मांडू लागल्यामुळे एक वेगळे जग या कवितेतून वाचकांसमोर आले आहे. स्वानुभवातून स्फुरलेली ही कविता अधिक जिवंत वाटत आहे.

१९६० नंतरची कविता अधिक सजग व सतर्क तसेच संवेदनशील आहे. आपल्यावर होणारा अन्याय, अत्याचार, दुर्लक्ष यांना वाचा फोडण्यासाठी कवींनी शब्दाचे हत्यार उगारलेले दिसते. दलित आणि ग्रामीण भागातील कवींच्या मनातील सुप्त, खदखदणारी चीड कवितेतून उद्रेकरूपाने बाहेर पडलेली आहे. स्त्रीलेखिकांनी आपले जीवन साहित्यात प्रतिबिंबित केले व स्त्रीजीवनावर होणाऱ्या अन्यायाचे पर्व संपून

समाजपरिवर्तनाची अपेक्षा बाळगली आहे. प्रसंगी आपले हक्क आपण मिळविण्याची उमेद जागवली आहे.

मात्र १९८० नंतरच्या अनेक कवींच्या कविता कलात्मकतेचा अभाव असणाऱ्या आढळतात. काही दलित व स्त्रीवादी कवितेत अन्यायाला वाचा फोडण्याची भाषा त्याच त्या आवर्तात फिरल्याने एकसूरी व नाविन्य हरवून बसणारी वाटते. संमेलनातून व्यासपीठ गाजवण्यासाठी लोकांची आवड लक्षात घेऊन लिहिण्याकडे आज कवींचा कल दिसतो. त्यामुळे चिंतनशीलता व विचारगर्भता याकडे काही प्रमाणात दुर्लक्ष होताना आढळते.

-----

## प्रकरण पहिले

## संदर्भ सूची


१. कोत्तापल्ले, नागनाथ : 'आधुनिक मराठी कविता: एक दृष्टिक्षेप', प्रतिभास प्रकाशन, परभणी, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९९, पृ.४.

२. बेडेकर, दि.के. : 'केशवसुतांची काव्यदृष्टी', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९६६, पृ.१२१.

३. गाडगीळ, स.रा. : 'मराठी काव्याचे मानदंड', खंड पहिला, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००५, पृ. २४९.

४. जोग, रा.श्री. : 'अर्वाचीन मराठी काव्य', दुसरी आवृत्ती, १९५१, पृ. २१९.

५. कुलकर्णी, गो.म. : 'आधुनिक मराठी कविता', मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती, १९९१, पृ. ५६.

६. कोत्तापल्ले, नागनाथ : 'आधुनिक मराठी कविता एक दृष्टिक्षेप', उनि., पृ.५५.

७. मुक्तिबोध, शरच्चंद्र : 'नवी मळवाट', प्रस्तावना, पृ. १९-२०.

८. जाधव, रा.ग. : 'साठोत्तरी मराठी कविता व कवी', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, २००७, पृ.१५९.

९. सद्रे, केशव : 'कवितेतील आधुनिकवाद', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती,जाने.२०००, पृ. २३४.

१०. कोत्तापल्ले, नागनाथ : 'आधुनिक मराठी कविता एक दृष्टिक्षेप', उनि. पृ.१००.

११. वाघ, विठ्ठल : 'काया मातीत मातीत', देशमुख आणि कंपनी, पुणे, १९९१, प्रस्तावना, पृ. ३४.

१२. सुमंत, नारायण : 'रानभैरी', अनुराधा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९८३, पृ.३९.

१३. भालेराव, इंद्रजित : 'पीकपाणी', पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, चौथी आवृत्ती, २००१, पृ. ९.

१४. कोत्तापल्ले, नागनाथ : उनि., पृ. १५२.

१५. शहाजिंदे, फ.म. : 'आदम', आंतरभारती प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९१, पृ.२३.

१६. कानडे, लहू : 'टाचाटीभा', सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, पृ.१४.

१७. निर्मळे, कृष्णा : 'पाणुता', संस्करण प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००३, पृ. ९२.

१८. घवी, रवींद्र : 'प्रदक्षिणा', खंड २, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९१, पृ. ३४-३५.

१९. ठाकूर, रवींद्र : 'प्रवाह आणि प्रतिक्रिया', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९९, पृ.७८.

२०. डहाके, वसंत आबाजी : 'कवितेविषयी', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९९, पृ. २३८.

----